महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# परिपत्रक

विषय – शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून इ.११ वी व १२ वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलाबाबत...

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी व इ. १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

## मूळ सूचना :-

For each multiple choice type of question, it is mandatory to write the corrtect answer along with its alphabet, e.g. (a)----- / (b)-----/ (c)-----/(d)-----, etc. No marks shall be given, if only the correct answer or the alphabet of correct answer is written. Only the first attempt will be considered for evaluation.

## बदल केलेली सूचना :-

For multiple choice type question, only the first attempt will be considered for evaluation.

तरी राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी सूचनांमधील उपरोक्त बदलाबाबत इ. ११ वी व १२ वी चे संबंधित विषय शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना अवगत करावे. तसेच उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर संपादित केल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिकांमधील सूचनांमध्ये वरीलप्रमाणे बदल करावा.

(माणिक बांगर)
प्र.सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

पुणे ४११ ००४.
दिनांक २६/१०/२०२३

---

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया

पत्र कमांक नाविमं / उ.मा.गो / प्र.सं / 3583
नागपूर, दिनांक : 03/11/2023

विषयः– शैक्षणिक वर्ष 2023–2024 पासून इ. 11 वी व इ.12 वी च्या भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला,वाणिज्य,विज्ञान)या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलाबाबत.

संदर्भः– 1)रा.मं. / परीक्षा–2 / 4738–पुणे दिनांक 26 / 10 / 2023
2)रा.मं. / परीक्षा–2 / 3589–पुणे दिनांक 17 / 08 / 2023

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रका नुसार सुचनांची नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४ | |

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे/तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/ 4738
पुणे -४११ ००४
दिनांक : २६/१०/२०२३

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इ.११वी व १२ वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला,वाणिज्य,विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलाबाबत...

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/ ३५८९ दि.१७/८/२०२३

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र पहावे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ व त्यापुढील परीक्षेसाठी गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलासंदर्भात विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सूचनांच्या अनुषंगाने विषयतज्ज्ञांची सभा दिनांक १३/१०/२०२३ रोजी पुणे विभागीय मंडळामध्ये आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये उपस्थित तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सुचनांबाबत अभिप्राय दिले आहेत.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इ.११ वी व १२ वी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला,वाणिज्य,विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांच्या बदलाबाबत परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

सदर बाब आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेमार्फत सर्व संबंधित विषय शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळ कार्यालयास सादर करावा.

सोबत - परिपत्रक

(माणिक बांगर)
प्र.सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.